मित्र/ मैत्रीण

आपला मित्र किंवा मैत्रीण काय असते माहीत आहे का !!!
अगदी फार मोठ्या अडचणीत वगैरे धावून येणे असंच काही नाही, पण अगदी रोजच्या काही किरकोळ विषयात पण त्यांची उपस्थिती, बोलणे, सहवास खूप मदत करून जातो,
एखाद्या रस्त्यात मोठा आडवा खड्डा/चर पडलेला असतो, त्यातून धक्का खाऊन जाणे आपण टाळतो, आणि एक बाजूला कुठे तरी थोडे दगड/डांबर याचा एक साधलेला भाग शिल्लक असतो, तिथे तेवढा खड्डा नसतो, तेवढ्यात आपल्या गाडीचे चाक बरोबर बसते, आपण पटकन गाडी त्यावरून पुढे नेतो, बस असंच काहीसं... ते तेवढ्यापुरत सांधलेलं असणं खूप काही करून जातं...

स.पु.
www.saarthbodh.com
सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी